दूरध्वनी :२४४७६१३८,२४४७५५७१,२४४७८३३५
फॅक्स : ०२०-२४४७७०९०, २४४८१२६९
ई-मेल : dir.mscert@gmail.com
dir.mscert@mahedu.gov.in

महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

**(विद्या परिषद)**

७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३०.

क्र.मराशैसंप्रप/प्रशैम/मूल्यमापन/२०१५/ 2460
दिनांक :- ७.८.२०१५

प्रति
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, सर्व

**विषय – प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत घ्यावयाच्या तीन चाचण्यांबाबत खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना अवगत करणे बाबत-**

**संदर्भ- शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. शैगुवि २०१५/(८०/१५)एस.डी ६ दि. २२ जून २०१५**

आपणांस अवगतच आहे की, **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम** हा राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. या अंतर्गत इ. २ री ते ८ वी या इयत्तांच्या भाषा व गणित या विषयांची पायाभूत चाचणी ऑगस्ट २०१५ अखेर घेण्यात येणार आहे. सर्व व्यवस्थापनांच्या शाळांचा यात समावेश करण्यात आला आहे.

या चाचण्यांबाबत अजूनही अनुदानित व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांना पुरेशी माहिती झालेली दिसून येत नाही. पायाभूत चाचणी नंतर प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीय सत्राच्या शेवटी संकलीत मूल्यमापन चाचण्या घेण्यात येणार आहेत.

या चाचण्यांबाबत प्रसार माध्यमांच्या मार्फत पुरेसे जनप्रबोधन होणे अगत्याचे आहे. त्यासाठी वृत्तपत्रांतून बातम्या, स्थानिक दूरदर्शन, आकाशवाणी केंद्र व गटस्तरावरील मुख्याध्यापकांच्या बैठका, बॅनर्स, पोस्टर्स या माध्यमातून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची माहिती जनसामान्यांमार्फत तसेच खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांतील शिक्षक,व्यवस्थापन,विद्यार्थी व पालकांना हया चाचण्यांबाबत इमेल, व्हॉटसअप या माध्यमातून उद्बोधन करावे. सदर पायाभूत चाचण्या सर्व व्यवस्थापनांच्या, सर्व माध्यमांच्या शाळांना अनिवार्य आहेत याबाबत सर्वांना अवगत करावे.

(गोविंद नांदेडे)
संचालक

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर-
१) मा.जिल्हाधिकारी (सर्व) महाराष्ट्र राज्य
२) मा. आयुक्त, सर्व महानगरपालिका महाराष्ट्र राज्य
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव सविनय सादर-
१) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) मा.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) मा.मंत्री, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव

प्रत सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव –
२/- त्यांना कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारीतील सर्व खाजगी प्राथमिक/ माध्यमिक शाळांना याबाबत त्वरीत परिपत्रक काढून अवगत करावे.

प्रत - सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका व सर्व सहा. अध्यापक यांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विना विलंब शिक्षण विभाग कार्यालयास सादर करावा.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर